स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा २२ वा केंद्रीय युवक महोत्सव दि.११ ते १५ फेब्रुवारी,२०२३ या कालावधीत धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

पाच कला प्रकारात २६ प्रकारच्या स्पर्धा होणार आहेत. त्यामध्ये **संगीत कला** प्रकारात शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, सुरवाद्य, नाट्यसंगीत, सुगम गायन भारतीय, समुहगीत भारतीय व पाश्चिमात्य, भारतीय लोकसंगीत, पाश्चिमात्य गायन, पाश्चिमात्य वाद्य संगीत या स्पर्धा होतील. नृत्यामध्ये समुह लोकनृत्य व शास्त्रीय नृत्य तसेच **साहित्य कला** प्रकारात वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा होतील. **नाट्यामध्ये** प्रहसन, मुकनाट्य व मिमिक्री यांचा समावेश आहे. **ललित कला** मध्ये रांगोळी, कोलाज, व्यंगचित्र, क्लेमॉडेलिंग, स्पॉट पेंटिंग, फोटोग्राफी, मेहंदी, इन्स्टालेशन, पोस्टर्स या स्पर्धा होणार आहेत.

राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवक महोत्सव व पश्चिम विभागीय युवक महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकाच्या वयाची अट २७ वर्षाची असल्यामुळे विद्यापीठाने यावर्षी पासून विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात देखील वयाची अट २५ ऐवजी २७ वर्षाची केली आहे. तसेच नाट्यसंगीत हा कला प्रकार नव्याने घेतला आहे. या शिवाय जिल्हानिहाय सांघिक तीनही जिल्ह्यातील प्रत्येकी एका महाविद्यालयाला उत्तेजनार्थ फिरता चषक दिला जाणार आहे.

महाविद्यालयांनी या तारखांची नोंद घेऊन युवक महोत्सवातील विविध कला प्रकारात अधिक विद्यार्थी सहभागी करावेत यासंदर्भातील माहिती विद्यापीठातील संलग्नित असलेल्या महाविद्यालयांना कळविण्यात आली आहे. यंदा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या विशेष संकल्पनेवर युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती विद्यापीठाच्या वतीने देण्यात आली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ६ जानेवारी, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी